महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

# आरोग्य विभागांतर्गत गट-क व गट ड संवर्गाच्या निकालाचे अनुषंगाने निर्देश

आरोग्य विभागातील गट क व गट ड मधील रिक्त पदे भरण्याकरीता ०८ जानेवारी २०१७ व २२ जानेवारी २०१७ रोजी झालेल्या लेखी परीक्षेचा निकाल व सुधारीत अंतिम उत्तरतालिका दिनांक २८ एप्रिल २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तथापी काही परीक्षार्थी उमेदवारांनी त्यांना लेखी परीक्षेत कमी गुण प्राप्त झाल्याबाबतची निवेदने सादर केली आहेत. तसेच काही परीक्षार्थी उमेदवारांनी त्यांनी पुर्वी घेतलेल्या आक्षेपांचा विचार न करता सुधारीत अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द केले असल्याबाबतचा आक्षेप घेतलेला आहे व नव्याने आक्षेप सादर केले आहेत.

या सर्व बाबींचा विचार करुन आरोग्य विभागाने नव्याने प्राप्त झालेले आक्षेप पुनश्चः तज्ञ समितीसमोर सादर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानूसार आक्षेपीत प्रश्न-उत्तरांबाबत फेरनिर्णय घेण्यात येऊन त्यानूसार सर्व उत्तरपत्रिकांची पुनःतपासणी करण्यात येईल व सुधारीत निकाल लवकरच प्रसिध्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

-स्वा-
संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई.

ठिकाण: मुंबई
दिनांक : 19/05/17